॥ मरणांत खरोखर जग जगतें ॥

भा. रा. तांबे.

मरणांत खरोखर जग जगतें;
अधिं मरण अमरपण ये मग तें ॥ धृ. ॥

अनंत मरणें अधीं मरावीं
स्वातंत्र्याची आस धरावी
मारिल मरणचि मरणा भावी
मग चिरंजीवपण ये बघ तें ॥ १ ॥

सर्वस्वाचें दान अधीं करिं
सर्वस्वच ये स्वयें तुझ्या घरिं
सर्वस्चाचा यज्ञ करीं तरि
रे ! स्वयें सैल बंधन पडतें ॥ २ ॥

स्वांतंत्र्याचा एकचि ठावा
केवळ यज्ञचि मजला ठावा;
यज्ञ मार्ग ! हो यज्ञ विसांवा !
का यज्ञाविण कांहीं मिळतें ? ॥ ३ ॥

सीता सति यज्ञीं दे निज बळि
उजळुनि ये सोन्याची पुतळी
बळी देउनी बळी हो बळी
यज्ञेंच पुढें पाउल बढतें ॥ ४ ॥

यज्ञिं अहर्निश रवि धगधगतो
स्वसत्त्वदानें पाश छेदितो
ज्योतिर्गण नव जन्मुनि जगतो
रे स्वभाव हा! उलटें भलतें ॥ ५ ॥

प्रकृति-गती ही मनिं उपजुनियां
उठा वीर कार्पण्य त्यजुनियां;

' जय हर!' गर्जा मातेस्तव या!
बडबडुनी कांहीं का मिळतें ? ॥ ६ ॥